# सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली

मुख्य कार्यालय - पद्मभूषण वसंतदादा पाटील मार्ग,
कर्मवीर भाऊराव पाटील चौक, सांगली - ४१६ ४१६.
☎(0233)2324641 to 45 E-mail - sanglidcc@gmail.com

## पाहिजेत

मुख्य कार्यालय व २१७ शाखांचेकडे कोअर बँकिंग प्रणाली असलेल्या आमच्या बँकेत खालील जागा भरावयाच्या आहेत. त्यासाठी खालील पात्रता व अनुभव धारण करणा-या व्यक्तींचेकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.नं. | पदाचे नांव | श्रेणी | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | अनुभव | वय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापक (अकौंटस्) | व्यवस्थापक | ०१ | पदवीधर व सी.ए./ आय.सी.डब्ल्यू.ए /एम.बी.ए. फायनान्स/डी.आय.टी/ जे.ए.आय.आय.बी./ सी.ए.आय.आय.बी./सी.पेक सर्टीफाईड कोर्सेस/एम.कॉम. | बँकिंग क्षेत्रातील वरिष्ठ व्यवस्थापन श्रेणीतील किमान ७ वर्षाचा अनुभव | ३० ते ४५ वर्षे |
| २ | प्रथम श्रेणी अधिकारी (गुंतवणूक) | प्रथम श्रेणी | ०१ | पदवीधर व सी.ए./जे.ए.आय. आय.बी./ सी.ए.आय.आय. बी./ सी.पेक सर्टीफाईड कोर्सेस/ एम.कॉम. | बँकिंग क्षेत्रातील अधिकारी श्रेणीचा किमान ७ वर्षाचा अनुभव | ३० ते ४५ वर्षे |
| ३ | द्वितीय श्रेणी अधिकारी (टॅक्सेशन) | द्वितीय श्रेणी | ०१ | पदवीधर व सी.ए./एम.बी.ए.फायनान्स/ डी.आय.टी/जे.ए.आय.आय.बी./ सी.ए.आय.आय.बी./सी.पेक सर्टीफाईड कोर्सेस/एम.कॉम. | बँकिंग /टॅक्सेशन क्षेत्रातील अधिकारी श्रेणीचा किमान ५ वर्षाचा अनुभव | ३० ते ४५ वर्षे |
| ४ | द्वितीय श्रेणी अधिकारी (ए.एल.एम.) | द्वितीय श्रेणी | ०१ | पदवीधर व सी.ए/ जे.ए.आय.आय.बी./ सी.ए.आय.आय.बी./सी.पेक सर्टीफाईड कोर्सेस/एम.कॉम. जी.डी.सी.अँड ए. | बँकिंग क्षेत्रातील अधिकारी श्रेणीचा किमान ५ वर्षे अनुभव | ३० ते ४५ वर्षे |
| ५ | तृतीय श्रेणी अधिकारी (गुंतवणूक) | तृतीय श्रेणी | ०३ | पदवीधर व जे.ए.आय.आय.बी./ सी.ए.आय.आय.बी./सी.पेक सर्टीफाईड कोर्सेस/एम.कॉम. जी.डी.सी.अँड ए. | बँकिंग क्षेत्रातील किमान ३ वर्षे अनुभव | २८ ते ४० वर्षे |
| ६ | व्यवस्थापक (आय.टी) | व्यवस्थापक | ०१ | एमई/बीई/बी.टेक कॉम्प्युटर सायन्स/ इलेक्ट्रॉनिक्स अँन्ड टेलीकम्युनिकेशन/ इन्फॉर्मेशन टेक्नालॉजी / एमसीए /एमसीएस | आय.टी.बँकिंग क्षेत्रातील ७ वर्षे अनुभव | ३० ते ४५ वर्षे |

| अ.नं. | पदाचे नांव | श्रेणी | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | अनुभव | वय |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | प्रथम श्रेणी अधिकारी (आय.टी) | प्रथम श्रेणी | १ | एमई/बीई/बी.टेक- कॉम्प्युटर सायन्स/ इलेक्ट्रॉनिक्स अँन्ड टेलीकम्युनिकेशन/ इन्फॉर्मेशन टेक्नालॉजी, एमसीए /एमसीएस ,बी.सी.ए -सीडॅक/नीट/सीड कोर्सेस | आय.टी.बँकिंग क्षेत्रातील ७ वर्षे अनुभव | ३० ते ४५ वर्षे |
| ८ | द्वितीय श्रेणी अधिकारी (आय.टी) | द्वितीय श्रेणी | २ | एमई/बीई/बी.टेक- कॉम्प्युटर सायन्स/ इलेक्ट्रॉनिक्स अँन्ड टेलीकम्युनिकेशन/ इन्फॉर्मेशन टेक्नालॉजी ,एमसीए /एमसीएस , बी.सी.ए. -सीडॅक/नीट/सीड कोर्सेस | आय.टी.बँकिंग क्षेत्रातील ५ वर्षे अनुभव | ३० ते ४५ वर्षे |
| ९ | तृतीय श्रेणी अधिकारी (आय.टी) | तृतीय श्रेणी | ४ | एमई/बीई/बी.टेक- कॉम्प्युटर सायन्स/ इलेक्ट्रॉनिक्स अँन्ड टेलीकम्युनिकेशन/ इन्फॉर्मेशन टेक्नालॉजी,एमसीए /एमसीएस , बी.सी.ए./डीसीएस - सीडॅक/नीट/सीड कोर्सेस | आय.टी. क्षेत्रातील ३ वर्षे अनुभव | २८ ते ४० वर्षे |
| १० | द्वितीय श्रेणी अधिकारी (कायदा) | द्वितीय श्रेणी | १ | पदवीधर व एल.एल.बी./ एल.एल.एम, | सहकारी बँकेतील कायदा विभागाकडील कामकाजाचा अधिकारी श्रेणीचा ५वर्षाचा अनुभव | ३० ते ४५ वर्षे |
| ११ | तृतीय श्रेणी अधिकारी (कायदा) | तृतीय श्रेणी | १ | पदवीधर व एल.एल.बी./ एल.एल.एम, | सहकारी बँकेतील कायदा विभागाकडील कामकाजाचा ३ वर्षाचा अनुभव | २८ ते ४० वर्षे |
| १२ | प्रथम श्रेणी अधिकारी (मार्केटिंग) | प्रथम श्रेणी | १ | पदवीधर व एम.बी.ए. - मार्केटिंग, जे.ए.आय.आय.बी./सी.ए.आय.आय बी./सी.पेक सर्टीफाईड कोर्सेस /एम.कॉम. | मार्केटिंग क्षेत्रातील ७ वर्षाचा अनुभव | ३० ते ४५ वर्षे |
| १३ | द्वितीय श्रेणी अधिकारी (मार्केटिंग) | द्वितीय श्रेणी | १ | पदवीधर व एम.बी.ए./ जे.ए.आय.आय.बी./ सी.ए.आय.आय.बी. / सी.पेक सर्टीफाईड कोर्सेस/एम.कॉम. | मार्केटिंग क्षेत्रातील ५ वर्षाचा अनुभव | ३० ते ४५ वर्षे |
| १४ | तृतीय श्रेणी अधिकारी (मार्केटिंग) | तृतीय श्रेणी | ६ | पदवीधर व एम.बी.ए., जे.ए.आय.आय.बी./ सी.ए.आय.आय.बी./सी.पेक सर्टीफाईड कोर्सेस/एम.कॉम. | मार्केटिंग क्षेत्रातील ३ वर्षाचा अनुभव | २८ ते ४० वर्षे |

| | |
|---|---|
| १ | **अर्ज करणेची पध्दत -**<br>उमेदवारानी सदरचे अर्ज हे बँकेच्या www.sanglidccbank.com या वेबसाईटवरून अर्जाचा नमुना व प्रक्रिया शुल्क भरणेचे चलन डाऊनलोड करून सादर करणेचे आहेत. त्याचबरोबर सदरचे अर्ज व पैसे भरणेचे चलन बँकेच्या मुख्य कार्यालयासह २१७ शाखांचेकडे देखील उपलब्ध आहेत. अर्जदारांनी शैक्षणिक पात्रतेच्या व अनुभवांच्या कागदपत्रांच्या सत्यप्रती, पासपोर्ट साईज फोटो, प्रक्रिया शुल्क भरलेचे चलन इ.सह अर्ज दि.२२/०८/२०१७ अखेर मा.प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली, मुख्य कार्यालय, पद्मभूषण वसंतदादा पाटील मार्ग, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, सांगली - ४१६४१६ या पत्त्यावर पाठवावेत. सदर पाकिटावर **ज्या पदासाठी अर्ज करणार आहात त्याचा उल्लेख ठळकपणे करावा.** मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. |
| २ | **प्रक्रिया शुल्क -**<br><table><tr><th>अ.नं.</th><th>श्रेणी</th><th>शुल्क</th></tr><tr><td>१</td><td>व्यवस्थापक श्रेणी</td><td>१०००/-</td></tr><tr><td>२</td><td>प्रथम श्रेणी अधिकारी</td><td>८५०/-</td></tr><tr><td>३</td><td>द्वितीय श्रेणी अधिकारी</td><td>८५०/-</td></tr><tr><td>४</td><td>तृतीय श्रेणी अधिकारी</td><td>८५०/-</td></tr></table>सदर प्रक्रिया शुल्क ना परतावा राहील. सांगली जिल्ह्यातील उमेदवारांनी त्यांचे प्रक्रिया शुल्क हे सांगली जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेच्या कोणत्याही शाखेत भरुन त्याची पोहोच पावती अर्जासोबत जोडणेची आहे. त्याचबरोबर अन्य जिल्ह्यातील उमेदवारांनी प्रक्रिया शुल्क साठी राष्ट्रीयकृत/कमर्शियल बँकेंचा सांगली येथे देय असलेला **सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली** या नावांने डी.डी. अर्जासोबत जोडणेचा आहे. |
| ३ | उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमीसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| ४ | **पदांच्या निवडीची कार्यपध्दती -**<br>जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता, अर्जामध्ये भरलेली माहिती, प्रक्रिया शुल्क, तसेच सादर केलेली कागदपत्रे इ. छाननी पूर्ण झालेनंतर पात्र उमेदवारांना तोंडी मुलाखती साठी बोलविणेत येईल. निवड समिती प्रतिनिधींनी मोजदाद केलेल्या मुलाखत गुणांची सरासरी काढून पात्र उमेदवारांची गुणानुक्रमे अंतिम निवड सूची तयार केली जाईल. |
| ५ | **परिविक्षाधीन कालावधी -**<br>निवड करणेत आलेल्या उमेदवारांना प्रथम एक वर्षासाठी परिविक्षाधीन सेवेत नेमणूक दिली जाईल. नेमणूक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधीन कालावधीमध्ये श्रेणीनिहाय खालीलप्रमाणे दरमहा संकलित पगार देण्यात येईल.<br><table><tr><td>अ</td><td>व्यवस्थापक श्रेणी</td><td>३०,०००/-</td></tr><tr><td>ब</td><td>प्रथम श्रेणी अधिकारी</td><td>२०,०००/-</td></tr><tr><td>क</td><td>द्वितीय श्रेणी अधिकारी</td><td>१८,०००/-</td></tr><tr><td>ड</td><td>तृतीय श्रेणी अधिकारी</td><td>१५,०००/-</td></tr></table> |

६ **वेतनश्रेणी -**

निवड झालेल्या उमेदवारांनी बँकेकडे किमान २ वर्षे सेवा करणेबाबत रू.२००/- मात्रचे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र देणेचे आहे. निवड करणेत आलेल्या उमेदवारांचा प्रथम एक वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी संपलेनंतर त्याला बँकेच्या सेवेमध्ये कायम केले जाईल. सेवेत कायम केलेनंतर खालीलप्रमाणे वेतनश्रेणी लागू राहील.

| अ.नं. | श्रेणी | एकूण पगार |
|---|---|---|
| अ | व्यवस्थापक श्रेणी | ३६५७४/- |
| ब | प्रथम श्रेणी अधिकारी | २२४०३/- |
| क | द्वितीय श्रेणी अधिकारी | १९६८६/- |
| ड | तृतीय श्रेणी अधिकारी | १६६७१/- |

७ अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अहर्ता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखाद्या अर्जदाराने त्याचे निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करणेत येईल. तसेच नियुक्ती झाली असलेस कोणतीही पूर्व सुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करणेत येईल व त्याच्या विरूध्द कायदेशिर कारवाई करणेत येईल.

८ अपात्र अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.

९ सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली कडील सध्या कार्यरत असलेले जे अधिकारी/कर्मचारी उपरोक्त जाहिरातीतील पात्रता धारण करीत असलेस ते देखील निश्चित केलेले प्रक्रिया शुल्क भरून अर्ज करू शकतील. मात्र सदरचे अर्ज करणेपूर्वी मुख्य कार्यालयाची लेखी परवानगी घेणे आवश्यक राहिल.

१० मुलाखतीस बोलविलेल्या अर्जदारांनी स्वखर्चाने उपस्थित रहाणेचे आहे.

११ मुलाखतीवेळी पात्र उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे,शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, आधारकार्ड इत्यादीच्या सत्यप्रती व मूळ कागदपत्रे घेवून येणेची आहेत. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणे करिता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

१२ भरती प्रक्रिया /मुलाखत स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः त्यात बदल करणे, पदाच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करणेचे अधिकार बँकेस रहातील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार बँकेस राहिल. याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

| | |
|---|---|
| १३ | ज्या उमेदवारांकडे जाहिरातीतील पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करू नयेत. |
| १४ | उमेदवारास एका पेक्षा अधिक पदासाठी अर्ज करावयाचा असलेस प्रत्येक पदाला स्वतंत्र अर्ज , कागदपत्रे व वेगळे प्रक्रिया शुल्क भरावे लागेल. |
| १५ | अर्जदारांनी अर्ज हे प्रत्यक्ष मुख्य कार्यलायामध्ये पोहोच करणेचे आहेत किंवा पोस्टानेच पाठविणेचे आहेत. बँकेच्या ई-मेल वर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. |
| १६ | अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडचणी आल्यास त्यासाठी १) ८३२९६ ७०९२१ २) ९८५०३ ४६४३३ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेमध्ये संपर्क साधावा. |

**ठिकाण - सांगली** **प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी** **चेअरमन**

**दिनांक - ०७/०८/२०१७**

# सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली

मुख्य कार्यालय - पद्मभूषण वसंतदादा पाटील मार्ग, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, सांगली - ४१६ ४१६.
☎(0233)2324641 to 45 E-mail - sanglidcc@gmail.com

## पाहिजेत

मुख्य कार्यालय व २१७ शाखांचेकडे कोअर बँकिंग प्रणाली असलेल्या आमच्या बँकेत खालील तांत्रीक (Technical Posts) जागा भरावयाच्या आहेत. त्यासाठी दि.२२/०८/२०१७ अखेर अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.नं. | श्रेणी | विभाग | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अकौंटस् | गुंतवणूक | टॅक्सेशन | ए.एल.एम. | आय.टी | कायदा | मार्केटिंग |
| १ | व्यवस्थापक | १ | - | - | - | १ | - | - |
| २ | प्रथम श्रेणी | - | १ | - | - | १ | - | १ |
| ३ | द्वितीय श्रेणी | - | - | १ | १ | २ | १ | १ |
| ४ | तृतीय श्रेणी | - | ३ | - | - | ४ | १ | ६ |
| | **एकूण** | **१** | **४** | **१** | **१** | **८** | **२** | **८** |

सदर भरतीची सविस्तर जाहिरात व अर्ज बँकेच्या **www.sanglidccbank.com** या वेबसाईटवर दिनांक ०७/०८/२०१७ पासून उपलब्ध आहेत. त्याचबरोबर सदरचे अर्ज व पैसे भरणेचे चलन बँकेच्या मुख्य कार्यालयासह २१७ शाखांचेकडे देखील उपलब्ध आहे. वेबसाईटवरील जाहीरातीमध्ये नमूद केलेप्रमाणे पात्र व अनुभवी उमेदवारानीच अर्ज करावेत.

**ठिकाण - सांगली** **प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी** **चेअरमन**
**दिनांक - ०४/०८/२०१७**